Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक

# जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।मंगळवार, दि. १२ मे २०२६। वर्ष १ ।अंक ३७ ।पाने २।

DIGITAL EDITION

देवस्थान जमिनी आता कसणाऱ्यांच्या मालकीच्या

(पान २ वर)



Selected

### एफसी बार्सिलोना ला-लिगा चॅम्पियन

बार्सिलोना: फुटबॉल विश्वातील प्रतिष्ठेच्या 'एल क्लासिको' सामन्यात रिअल माद्रिदचा २-० असा पराभव करत एफसी बार्सिलोनाने २०२५-२६ हंगामातील ला-लिगा विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. या विजयासह बार्सिलोना संघाने स्पॅनिश फुटबॉलमध्ये पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

### तृषाची व्हायरल पोस्ट; अन् स्टॅलिन यांची भेट

चेन्नई: जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर सी. जोसेफ विजय हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना अभिनेत्री तृषा कृष्णन हिची उपस्थिती अजूनही गाजत आहे. सोशल मीडियावर शेअर केलेली पोस्ट आणि त्याचे कॅप्शन सध्या व्हायरल होत आहे. विजय यांनी शपथविधीच्या दुसऱ्याच दिवशी माजी मुख्यमंत्री आणि डीएमके प्रमुख एम.के. स्टॅलिन यांची सदिच्छा भेट घेतली.

## सोमनाथच्या भूमीतून मोदींकडून 'ऑपरेशन शक्ती'चे स्मरण


# पोखरण अणुस्फोटाने जगाला केले चकित

### 'शक्ती आणि भक्तीचा संगम भारताला आत्मनिर्भरतेकडे घेऊन गेला', राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनानिमित्त पंतप्रधानांचा संदेश

जन सम्राट टाईम्स

**सोमनाथ | प्रतिनिधी : राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील सोमनाथ येथे आयोजित 'अमृतपर्व' सोहळ्यात सहभागी होत भारताच्या वैज्ञानिक आणि आध्यात्मिक शक्तीचा संगम अधोरेखित केला. सोमनाथ मंदिरात दर्शन आणि पूजा-अर्चा केल्यानंतर त्यांनी १९९८ मध्ये झालेल्या ऐतिहासिक पोखरण अणुचाचणी अर्थात 'ऑपरेशन शक्ती'चे स्मरण करत भारताच्या आत्मनिर्भरतेचा प्रवास उलगडून सांगितला.**

"सोमनाथची ही भूमी शक्ती आणि भक्तीचे प्रतीक आहे. याच दिवशी भारताने पोखरणमध्ये आपल्या वैज्ञानिक सामर्थ्याचा परिचय जगाला करून देत संपूर्ण जगाला चकित केले होते," असे सांगत पंतप्रधानांनी माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी आणि भारतरत्न डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. भारताला अणुशक्तीसंपन्न राष्ट्र बनवण्याचा तो निर्णय देशाच्या स्वाभिमानासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी पंतप्रधानांनी सोमनाथ मंदिर परिसरातील विविध विकासकामांचे लोकार्पणही केले. त्यांनी स्पष्ट केले की, ज्या प्रकारे सोमनाथ मंदिर भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाचे



प्रतीक आहे, त्याचप्रमाणे पोखरण अणुचाचणी आधुनिक भारताच्या आत्मविश्वासाची आणि स्वावलंबनाची सुरुवात होती. मोदी म्हणाले, "अमृतकाळात भारत आता केवळ तंत्रज्ञान वापरणारा देश नाही, तर तंत्रज्ञान निर्माण करणारा देश बनत आहे." संरक्षण, अवकाश संशोधन, डिजिटल तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रात भारताने घेतलेली झेप ही 'ऑपरेशन शक्ती'मधून मिळालेल्या आत्मविश्वासाचे फलित असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. देशातील तरुण शास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थ्यांना संबोधित करताना पंतप्रधानांनी 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेची पुनरुच्चार केला. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), सायबर सुरक्षा, हरित ऊर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांत भारताने जागतिक नेतृत्व करावे, असे आवाहन त्यांनी केले. "नव्या भारताचा पाया विज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांवर उभा राहणार आहे," असेही ते म्हणाले. सोमनाथच्या पवित्र भूमीतून दिलेला हा संदेश केवळ धार्मिक नव्हे, तर राष्ट्रीय स्वाभिमान, वैज्ञानिक प्रगती आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला नवी ऊर्जा देणारा ठरला. 'अमृतपर्व' सोहळ्याच्या निमित्ताने अध्यात्म आणि विज्ञानाचा संगम अनुभवताना उपस्थित भाविक आणि नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**ठळक मुद्दे :**

- पंतप्रधान मोदींकडून सोमनाथ मंदिरात पूजा-अर्चा
- पोखरण-२ अणुचाचणीच्या २८ वर्षांच्या यशाचे स्मरण
- 'ऑपरेशन शक्ती'मुळे भारताला जागतिक ओळख
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि आत्मनिर्भरतेवर मोदींचा भर
- 'विकसित भारत २०४७'साठी संशोधनाचे आवाहन

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## राज्यातील सर्व विभागीय बैठका यापुढे ऑनलाइन

### सरकारी कामासाठी 'ई-व्ही'चा वापर

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी आणि इंधन बचतीसाठी केलेल्या आवाहनाची दखल घेत महाराष्ट्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. यावर्षी फ्रान्समध्ये होणाऱ्या प्रतिष्ठित 'कान्स चित्रपट महोत्सवा'साठी नियोजित असलेला सरकारी अधिकाऱ्यांचा दौरा तातडीने रद्द करण्यात आला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी या निर्णयाची घोषणा केली. त्यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या जागतिक आर्थिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर सरकारी तिजोरीवर पडणारा अनावश्यक भार कमी करणे ही काळाची गरज आहे. याशिवाय, राज्यातील सर्व विभागीय बैठका यापुढे ऑनलाइन घेतल्या जाणार असून सरकारी कामासाठी 'ई-व्ही'चा वापर केला जाईल. मंत्री व अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरेही बंद केले जाणार आहेत. या निर्णयामुळे १२ मे पासून सुरू होणाऱ्या कान्स महोत्सवात महाराष्ट्राचे कोणतेही शासकीय शिष्टमंडळ सहभागी होणार नाही. विशेष म्हणजे, यावर्षी 'जीव' आणि 'एप्रिल-मे ९९' या दोन मराठी चित्रपटांची या महोत्सवासाठी निवड



झाली आहे. सरकारी अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार नसले तरी, सरकार या चित्रपटांच्या जागतिक प्रमोशनसाठी डिजिटल माध्यमांचा आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करणार आहे.

### प्रशासकीय कामकाजातही मोठे बदल

राज्य सरकारने प्रशासकीय कामकाजातही मोठे बदल जाहीर केले आहेत.बैठकी ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जातील आणि सरकारी कामकाजात केवळ इलेक्ट्रिक वाहनांचाच (ईव्ही) वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. इंधन आयात कमी करण्यासाठी आणि परकीय चलन वाचवण्यासाठी पंतप्रधानांनी 'वर्क फ्रॉम होम' व्हर्च्युअल मीटिंग्सनाप्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

## पेट्रोल दरवाढ अटळ असल्याची चिन्हे

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ आणि मध्य-पूर्वेतील तणावामुळे भारतातील सरकारी तेल मार्केटिंग कंपन्यांच्या तोट्यात मोठी वाढ झाली आहे. इंडियन ऑईल, बीपीसीएल आणि एचपीसीएल यांसारख्या कंपन्यांना सध्या दरमहा सुमारे ३०,००० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. दैनंदिन स्तरावर हा आकडा १,६०० ते १,७०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलरच्या वर स्थिर राहिल्याने या कंपन्यांवर प्रचंड आर्थिक ताण निर्माण झाला आहे, ज्यामुळे इंधन दरवाढ आता अटळ असल्याची चिन्हे दिसत आहेत. सध्याच्या आकडेवारीनुसार, तेल कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर १४ ते १८ रुपये आणि डिझेलवर १८ ते ३५ रुपयांपर्यंत तोटा (अंडर-रिकव्हरी) सहन करावा लागत आहे. गेल्या चार वर्षांपासून किरकोळ विक्री दरात मोठी वाढ करण्यात आली नसली तरी, आता वाढत्या तोट्यामुळे १५ मे २०२६ पर्यंत इंधन दरात प्रति लिटर ४ ते ५ रुपयांची वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जरी पेट्रोलियम मंत्रालयाने सध्यातरी 'तातडीने दरवाढ करण्याचा कोणताही अधिकृत प्रस्ताव नाही' असे म्हटले असले तरी, वाढती आर्थिक तूट आणि तेल कंपन्यांची ढासळती स्थिती पाहता ही दरवाढ अधिक काळ रोखणे सरकारला कठीण जाणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. ज्यामुळे दरवाढीच्या शक्यतांना अधिक बळ मिळाले आहे. परकीय चलन साठ्यावरील ताण कमी करण्यासाठी नागरिकांनी कारपूलिंग आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असा सल्ला पंतप्रधानांनी दिला आहे.

## युद्ध आणि निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेचे तीन-तेरा; देशात प्रचंड बेरोजगारी

जन सम्राट टाईम्स

**तेहरान/वॉशिंग्टन:** इराणची अर्थव्यवस्था गेल्या अनेक दशकांपासून आंतरराष्ट्रीय निर्बंध, चलनाची घसरण आणि देशांतर्गत धोरणात्मक त्रुटींमुळे आधीच डबघाईला आलेली असताना, आता अमेरिका आणि इस्रायलसोबतच्या युद्धामुळे ती पूर्णपणे कोलमडली आहे. सध्या इराणमध्ये बेरोजगारीची सर्वात मोठी लाट पाहायला मिळत आहे. तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील अनेक कंपन्यांना नाईलाजाने मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात (मास ले-ऑफ) करावी लागत आहे. युद्धाच्या काळात पायाभूत सुविधांचे झालेले नुकसान, अमेरिकेने इराणच्या बंदरांवर घातलेली नाकेबंदी आणि वाढती महागाई यामुळे पूर्वीपासून संघर्ष करत असलेल्या कंपन्या आता बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. इंटरनेट बंदीमुळे आयटी आणि डिजिटल क्षेत्राचे मोठे नुकसान या आर्थिक संकटाचा सर्वाधिक फटका इराणच्या झपाट्याने वाढणाऱ्या डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्राला बसला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव इराण सरकारने इंटरनेट सेवेवर घातलेल्या कठोर निर्बंधांमुळे ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स, ई-कॉमर्स आणि डिजिटल अर्थव्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या कंपन्यांचा व्यवसाय अक्षरशः ठप्प झाला आहे. एका अहवालानुसार, या इंटरनेट बंदीमुळे देशाला दररोज सुमारे ८० दशलक्ष डॉलर्सचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

## देश चालवणे ही पंतप्रधान मोदींच्या आवाक्याबाहेरची गोष्ट - राहुल गांधी

### सरकार आर्थिक आघाडीवर अपयशी; सामान्य जनतेला मोजावी लागतेय किंमत

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील आवाहनांवर कडाडून टीका केली आहे. 'देश चालवणे मोदींच्या आवाक्यातली गोष्ट नाही' अशा शब्दांत हल्लाबोल केला आहे. पंतप्रधानांनी नागरिकांना सोने न खरेदी करण्याचे आणि परदेश दौरा टाळण्याचे जे आवाहन केले आहे, ते केवळ उपदेश नसून सरकारच्या आर्थिक अपयशाचे जिवंत पुरावे आहेत, असा दावा राहुल गांधी यांनी केला. देशाची अर्थव्यवस्था सावरण्यात केंद्र सरकारला अपयश आल्यानेच आता जनतेवर अशा प्रकारची बंधने लादली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राहुल गांधी यांनी नमूद केले की, पंतप्रधानांनी केलेल्या या सात आवाहनांमधून देशाच्या तिजोरीतील परकीय चलनाची खालावलेली स्थिती स्पष्टपणे समोर येत आहे. परकीय चलन साठा वाचवण्यासाठी लोकांना त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी आणि गुंतवणुकीवर नियंत्रण ठेवण्यास सांगणे हे एक



प्रकारे सरकारची हतबलता दर्शवते. सरकारने आर्थिक धोरणे राबवताना केलेल्या चुकांची किंमत आता सामान्य जनतेला मोजावी लागत असल्याची टीका त्यांनी केली असून, हे केवळ सल्ले नसून देशाच्या डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेचे निदर्शक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या राजकीय वादात राहुल गांधींनी पुढे म्हटले आहे की, मोदी सरकार केवळ भाषणांच्या आणि सल्ल्यांच्या माध्यमातून आपली जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करत आहे. प्रत्यक्ष काम करण्याऐवजी लोकांना 'हे करू नका, ते करू नका' असे सांगणे हे प्रशासकीय नाकर्तेपणाचे लक्षण आहे. दागिन्यांचे क्षेत्र आणि पर्यटन उद्योगावर पंतप्रधानांच्या या आवाहनांचा आधीच विपरीत परिणाम होत असताना, विरोधकांनी थेट पंतप्रधानांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## जामिनासाठी 'तारीख पे तारीख' आता बंद!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** देशातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांचा निपटारा करण्यासाठी आणि जामीन प्रक्रिया अधिक वेगवान करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने 'वन केस, एक डेटा' ही नवी डिजिटल प्रणाली लागू करण्यावर भर दिला आहे. सध्याच्या पद्धतीत, एखाद्या व्यक्तीला जामीन हवा असेल, तर त्याचे कागदपत्रे, जुने गुन्हे किंवा केसची सद्यस्थिती शोधण्यात पोलिसांना आणि न्यायालयाला बराच वेळ लागतो. माहिती वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे जामिनावर सुनावणी पुढे ढकलली जाते (तारीख पे तारीख). यामुळे कैद्यांना विनाकारण जास्त काळ तुरुंगात राहावे लागते. सर्वोच्च न्यायालयाच्या मते, "न्याय मिळण्यास होणारा विलंब हा अन्याय करण्यासारखाच आहे." त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर करून सामान्य माणसाचा वेळ आणि पैसा वाचवणे हे या प्रणालीचे मुख्य उद्दिष्ट आहे. जामिनासारख्या मूलभूत अधिकारासाठी कोणालाही तांत्रिक कारणांमुळे ताटकळत राहावे लागू नये, अशी न्यायालयाची भूमिका आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

## साहित्य, कला आणि समाजसेवेचा दिमाखदार "दिनकर सन्मान" सोहळा उत्साहात संपन्न

### कविसंमेलन, भीमगीत प्रकाशन आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव; साहित्यप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली:** साहित्य, कला, पत्रकारिता, शिक्षण, समाजसेवा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा विविध "दिनकर सन्मान" पुरस्कारांनी गौरव करणारा भव्य सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कविसंमेलन, अभिवाचन, भीमगीत प्रकाशन आणि पुरस्कार वितरण अशा विविध उपक्रमांनी सजलेल्या या कार्यक्रमाला साहित्यप्रेमी आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे आयोजक तथा "मराठी साहित्य व कला सेवा" संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या दशकभराच्या साहित्य-सांस्कृतिक प्रवासाचा आढावा घेत मराठी भाषा, साहित्य आणि कलेच्या जतनासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. या सोहळ्यास लोकसंगीत गायक नंदेश विठ्ठल उमप, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मीनाक्षी पाटील, शिवसाहित्याचे अभ्यासक डॉ. हेमंतराजे गायकवाड तसेच दैनिक नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांचा शाल, सन्मानचिन्ह आणि पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी नंदेश उमप म्हणाले, "लोककला आणि साहित्य यांचा वारसा जपणाऱ्या संस्था समाजाला सांस्कृतिक दिशा देतात." तर डॉ. मीनाक्षी पाटील यांनी "नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही



मोठी सांस्कृतिक सेवा आहे," असे सांगितले. डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी मराठी भाषा आणि संस्कृती संवर्धनासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. प्रकाश सावंत यांनी पत्रकारिता, साहित्य आणि समाजकार्य यांचा संगम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या भीमगीत प्रकाशन सोहळ्यात संस्थेचे सदस्य विलास सूर्यवंशी लिखित भीमगीताचे प्रकाशन करण्यात आले. गीताच्या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली. या वेळी पत्रकारिता, साहित्य, समाजसेवा, शिक्षण, कला आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांना विविध "दिनकर सन्मान" पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पॅरिस ऑलिम्पिकसह आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चेसबॉक्सिंग प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्नेहा वायकर यांना "दिनकर खेलरत्न सन्मान" प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात आयोजित कविसंमेलन आणि अभिवाचनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. ज्योती राखुंडे, विवेक वसंत जोशी, सीमा खान शेख, रूपाली जाधव, डॉ. मानसी पाटील, कृपा म्हात्रे आदी कवी-कवयित्रींनी आपल्या रचनांमधून साहित्यिक रंगत निर्माण केली.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित साहित्यिक, कलाकार, संस्था आणि रसिकांचे आयोजकांनी आभार मानले.

### स्नेहा वायकर यांना "दिनकर खेलरत्न सन्मान"

"लोककला आणि साहित्य यांचा वारसा जपणाऱ्या संस्था समाजाला सांस्कृतिक दिशा देतात." तर डॉ. मीनाक्षी पाटील यांनी "नवोदितांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही मोठी सांस्कृतिक सेवा आहे," असे सांगितले. डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी मराठी भाषा आणि संस्कृती संवर्धनासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. प्रकाश सावंत यांनी पत्रकारिता, साहित्य आणि समाजकार्य यांचा संगम समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतो, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या भीमगीत प्रकाशन सोहळ्यात संस्थेचे सदस्य विलास सूर्यवंशी लिखित भीमगीताचे प्रकाशन करण्यात आले. गीताच्या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली. या वेळी पत्रकारिता, साहित्य, समाजसेवा, शिक्षण, कला आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांना विविध "दिनकर सन्मान" पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पॅरिस ऑलिम्पिकसह आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये चेसबॉक्सिंग प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्नेहा वायकर यांना "दिनकर खेलरत्न सन्मान" प्रदान करण्यात आला.

» Selected

## देशाच्या अर्थव्यवस्थेचे नेतृत्व आता राष्ट्राच्या हाती : मुख्यमंत्री

**मुंबई:** पायाभूत सुविधा, नाविण्यपूर्णता, प्रतिभा, स्वच्छ ऊर्जा, सुव्यवस्थित शहरीकरण,तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवरून भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार आहे. या सर्व शक्तींचा सहयोग साधणाऱ्या अर्थव्यवस्था भविष्याचे नेतृत्व करणार असल्याने महाराष्ट्र त्यादृष्टीने आवश्यक परिसंस्था (इकोसिस्टीम) उभारत आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली. नवी दिल्ली येथील हॉटेल ताज पॅलेसमध्ये भारतीय उद्योग परिसंघा तर्फे (सीआयआय) आयोजित दोन दिवसीय परिषदेत एका परिसंवादात ( Vision For India @100) मुख्यमंत्री बोलत होते. सीआयआयचे संचालक जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

# लाचखोर अभियंत्यास न्यायालयाकडून 2 दिवसांची पोलीस कोठडी!

## ३८ लाखांचे बिल मंजूर करण्यासाठी १५ लाखांची मागणी

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव सार्वजनिक बांधकाम विभागातील (PWD) शाखा अभियंता योगेश अभिमन्यू अहिरे यांना ५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडल्यानंतर न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागात एकच खळबळ उडाली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे सब-कॉन्ट्रॅक्टर असून त्यांनी जळगाव शहरातील वॉर्ड क्रमांक १४, विनोबा नगर परिसरातील सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम पूर्ण केले होते. या कामाचे सुमारे ३८ लाख ४९ हजार रुपयांचे बिल मंजूर करण्यासाठी शाखा अभियंता योगेश अहिरे यांनी सुरुवातीला तब्बल १८ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. त्यानंतर तडजोडीअंती ही रक्कम १५ लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली. त्यामध्ये स्वतःसाठी ७ लाख ५० हजार रुपये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी ७ लाख ५० हजार रुपये देण्याचे मान्य करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या रकमेपैकी पहिला हप्ता म्हणून ५ लाख रुपये ९ मे रोजी देण्याचे ठरले होते. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने जळगाव सार्वजनिक बांधकाम विभाग परिसरात सापळा रचला. आरोपी योगेश अहिरे यांनी त्यांच्या निळ्या रंगाच्या बलेनो कारमध्ये (MH-19/CV-2619) बसून ५ लाख रुपयांची लाच स्वीकारताच दबा धरून बसलेल्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. ही कारवाई नाशिक परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, जळगाव एसीबीचे उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रेश्मा आवतारे आणि त्यांच्या पथकाने केली. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून रविवारी आरोपीला जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १२ मे २०२६ पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास सुरू आहे.

### 18 लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप

योगेश अहिरे यांनी सुरुवातीला तब्बल १८ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. त्यानंतर तडजोडीअंती ही रक्कम १५ लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली. त्यामध्ये स्वतःसाठी ७ लाख ५० हजार रुपये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी ७ लाख ५० हजार रुपये देण्याचे मान्य करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या रकमेपैकी पहिला हप्ता म्हणून ५ लाख रुपये ९ मे रोजी देण्याचे ठरले होते. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने जळगाव सार्वजनिक बांधकाम विभाग परिसरात सापळा रचला. आरोपी योगेश अहिरे यांनी ५ लाख रुपयांची लाच स्वीकारताच दबा धरून बसलेल्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

## देवस्थान जमिनी आता कसणाऱ्यांच्या मालकीच्या

जन सम्राट टाईम्स



**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्या प्रलंबित असलेल्या देवस्थान इनाम जमिनींच्या मालकी हक्काचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली की, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणासह राज्यातील सुमारे साडेचार लाख हेक्टर देवस्थान जमिनी आता प्रत्यक्ष कसणाऱ्या वहिवाटदारांच्या (शेतकऱ्यांच्या) मालकीच्या होणार आहेत. यासाठी सरकारने 'महाराष्ट्र देवस्थान इनाम जमिनी निर्मूलन कायदा, २०२६' चा मसुदा तयार केला असून, यामुळे जमिनींच्या हस्तांतरण आणि विकासावरील अनेक वर्षांचे निर्बंध आता संपुष्टात येणार आहेत. या नवीन धोरणानुसार, देवस्थानच्या जमिनी (वर्ग-३) कसत असलेल्या शेतकऱ्यांना ठराविक 'अधिमूल्य' (प्रीमियम) भरून या जमिनींचे पूर्ण मालकी हक्क (वर्ग-१) प्राप्त करता येतील. शेतकऱ्यांकडून जमा होणारे हे अधिमूल्य थेट संबंधित देवस्थानच्या ट्रस्टला दिले जाईल, जेणेकरून मंदिरांच्या देखभालीसाठी आणि धार्मिक कार्यांसाठी कायमस्वरूपी निधी उपलब्ध होईल. या निर्णयामुळे केवळ शेतकऱ्यांची अनिश्चितता संपणार नाही, तर ज्या जमिनी केवळ मालकी हक्काअभावी पडीक होत्या किंवा ज्यांचा विकास रखडला होता, अशा जमिनी आता आर्थिक चक्रात समाविष्ट होऊ शकतील. महसूल विभागाच्या अधिकृत माहितीनुसार, या प्रस्तावित कायद्याचा मसुदा हरकती व सूचनांसाठी सार्वजनिक करण्यात आला आहे. नागरिकांना यावर ५ जून २०२६ पर्यंत आपले अभिप्राय नोंदवता येणार आहेत.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## इन्स्टाग्रामवरील प्रेमासाठी बांगलादेशातून थेट जळगाव गाठलं

### बांगलादेशी तरुणी शनिपेठ पोलिसांच्या ताब्यात



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** शहरात सोशल मीडियातून जुळलेल्या प्रेमसंबंधामुळे बांगलादेशातून थेट भारतात आलेल्या तरुणीचे प्रकरण समोर आल्याने खळबळ उडाली आहे. विनाविसा आणि वैध कागदपत्रांशिवाय भारतात राहत असल्याप्रकरणी शनिपेठ पोलिसांनी बांगलादेशी तरुणीला ताब्यात घेतले असून तिला आश्रय देणाऱ्या युवकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोई गल्ली, जोशी पेठ परिसरात एक परदेशी महिला बेकायदेशीररीत्या राहत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात छापा टाकला असता २० वर्षीय कोणीका राणी शामलचंद्र राय ही तरुणी आढळून आली. तपासादरम्यान तिच्याकडे कोणतेही वैध पासपोर्ट, व्हिसा किंवा अधिकृत प्रवास कागदपत्र नसल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत ती बेकायदेशीरपणे भारतात दाखल झाल्याचे उघड झाले असून या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, कोणीका राणी आणि जळगावातील सोने कारागीर चिन्मय जगन्नाथ वाला यांची ओळख इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झाली होती. सोशल मीडियावरील मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले आणि त्यानंतर लग्न करण्याच्या उद्देशाने कोणीका हिने बांगलादेशातून भारतात प्रवेश केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोघांविरोधात इमिग्रेशन कायदा तसेच परदेशी नागरिक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कोणीका आणि चिन्मय यांनी विवाह केल्याचा दावा केला असला तरी त्यासंदर्भातील कोणताही अधिकृत पुरावा अद्याप पोलिसांसमोर सादर करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी साजिद मन्सुरी करत आहेत. सोशल मीडियातून निर्माण होणारे संबंध, त्यातून वाढणारे संपर्क आणि सुरक्षेच्या दृष्टीने निर्माण होणारे प्रश्न यावरून या घटनेनंतर पुन्हा चर्चा रंगू लागली आहे.

### बेकायदेशीरपणे भारतात दाखल

प्राथमिक चौकशीत ती बेकायदेशीरपणे भारतात दाखल झाल्याचे उघड झाले असून या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.कोणीका राणी आणि जळगावातील सोने कारागीर चिन्मय जगन्नाथ वाला यांची ओळख इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झाली होती. मैत्रीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले आणि त्यानंतर लग्न करण्याच्या उद्देशाने कोणीका हिने बांगलादेशातून भारतात प्रवेश केल्याची माहिती समोर आली आहे.

## धनश्री पाटील ठरली धरणगाव तालुक्यात प्रथम

### ९५.८० टक्के गुणांसह घवघवीत यश



। जन सम्राट टाईम्स ।

**धरणगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेत सारजाई कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयाने पुन्हा एकदा १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या यशामुळे धरणगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी विद्यालयातून एकूण २८१ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. विशेष म्हणजे सर्वच्या सर्व विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील विद्यार्थिनी धनश्री अनिल पाटील हिने ९५.८० टक्के गुण मिळवत विद्यालयासह संपूर्ण धरणगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. भूमिका कृष्णराव पवार आणि उज्वल सुभाष महाजन यांनी प्रत्येकी ९४.८० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर खुशी चेतन भावसार हिने ९४.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. विद्यालयाच्या गुणवत्तेचा आलेख यंदाही उंचावलेला दिसून आला. तब्बल ५३ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले, तर १९६ विद्यार्थी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हेमलालशेठ भाटिया, सचिव ललित उपासनी, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, संचालक मंडळ, मुख्याध्यापक एस. एस. पाटील, व्ही. बी. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## भक्तीचा महाकुंभ! नशीराबादमध्ये झिपरू अण्णा महाराजांचा ७७ वा पुण्यतिथी उत्सव

### पालखी सोहळा, दिंडी, नवनाथ कथा आणि महाप्रसाद

। जन सम्राट टाईम्स ।



**नशीराबाद | प्रतिनिधी;** खान्देशातील जनमानसाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत झिपरू अण्णा महाराजांचा ७७ वा पुण्यतिथी उत्सव नशीराबाद नगरीत अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. “झिपरू अण्णा महाराज की जय”च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने नशीराबाद नगरी भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाली. उत्सवाची सुरुवात सालाबादप्रमाणे कुलकर्णी परिवारातर्फे श्रीजींच्या मंगलमय अभिषेकाने झाली. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींनी मंदिर परिसर भक्तिरसात रंगून गेला. सोहळ्याचे मुख्य पुजारी जयंत गुरव यांनी महापूजा आणि सर्व धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने संपन्न केले. यानंतर गावातून भव्य दिंडी आणि पालखी सोहळा काढण्यात आला. टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंगांच्या सुरावटीत आणि पारंपरिक वेशभूषेतील वारकऱ्यांच्या सहभागामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. महिलांनी डोक्यावर तुळशीवृंदावन घेत सहभाग नोंदवत दिंडीची शोभा वाढवली. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी अण्णा महाराजांच्या पालखीची मनोभावे आरती करून दर्शन घेतले. यावेळी विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुण्यतिथी सोहळ्याचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे ह.भ.प. गोपाळ महाराज गारमोडे यांच्या रसाळ वाणीतून रंगलेली ‘नवनाथ कथा’. अध्यात्मिक विचारांनी परिपूर्ण असलेल्या या कथेमुळे भाविकांना भक्तीची अनोखी अनुभूती मिळाली. आज या कथेची सांगता मोठ्या उत्साहात करण्यात आली. उत्सवानिमित्त आयोजित भव्य महाप्रसादालाही भाविकांनी मोठा प्रतिसाद दिला. सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. “अन्नदान हेच श्रेष्ठ दान” या उक्तीचा प्रत्यय या सोहळ्यातून आला. या धार्मिक उत्सवासाठी नशीराबादसह पंचक्रोशीतील हजारो भाविक, आजी-माजी लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक आणि वारकरी संप्रदायातील भक्तांनी उपस्थिती लावली. सोहळा यशस्वी करण्यासाठी उत्सव समिती आणि स्थानिक स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## ट्रम्प यांनी इराणचा शांतता प्रस्ताव फेटाळला

**वॉशिंग्टन/तेहरान |** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणने दिलेला शांतता प्रस्ताव आणि अमेरिकेच्या 'पीस प्लॅन'वर इराणने दिलेला प्रतिसाद पूर्णपणे धुडकावून लावला आहे. रविवारी मध्यरात्री ही शांतता चर्चा निष्फळ ठरल्याचे जाहीर करण्यात आले. ट्रम्प यांनी इराणवर कडक शब्दांत टीका करताना म्हटले की, "तेहरान गेल्या ४७ वर्षांपासून अमेरिका आणि संपूर्ण जगाशी 'खेळ' खेळत आहे, परंतु आता त्यांना यापुढे हे सहजतेने घेता येणार नाही. या शांतता प्रस्तावात अमेरिकेसमोर काही अत्यंत कठीण अटी ठेवल्या होत्या, ज्या ट्रम्प प्रशासनाने फेटाळून लावल्या. इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी सोमवारी दिलेल्या माहितीनुसार, इराणने अमेरिकेकडून 'युद्ध नुकसान भरपाई' मिळावी, हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणच्या सार्वभौमत्वाला अधिकृत मान्यता द्यावी आणि इराणवर लादलेले सर्व आर्थिक निर्बंध तातडीने उठवावेत, अशा मागण्या केल्या होत्या.

## ‘करिअर डिस्कव्हरी समिट २०२६’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### ‘अनिकेत चव्हाण यूथ इनिशिएटिव्ह’चा उपक्रम; तज्ज्ञांनी दिले मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स




**पुणे प्रतिनिधी :** आजच्या वेगाने बदलणाऱ्या आणि स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना योग्य करिअर दिशा मिळावी, त्यांच्या क्षमता ओळखून त्यांना भविष्याचा मार्ग सापडावा या उद्देशाने ‘अनिकेत चव्हाण यूथ इनिशिएटिव्ह’तर्फे आयोजित करण्यात आलेल्या ‘करिअर डिस्कव्हरी समिट २०२६’ या विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धायरी येथील धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानच्या संकुलात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक अनिकेत सोपान (काका) चव्हाण यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना बदलत्या करिअर संधी, कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा आणि भविष्यातील रोजगार क्षेत्रांबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बापूसाहेब गायकवाड, ऋषी हराळ, अनूप कुमार, रमा काळे, रावसाहेब घुगे आणि विजय नवले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत करिअर क्षेत्रातील वास्तव परिस्थिती आणि नव्या संधींबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रश्न विचारत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमात बोलताना अनिकेत चव्हाण म्हणाले, “आज अनेक विद्यार्थी आणि पालक करिअरच्या बाबतीत संभ्रमात असतात. पारंपरिक क्षेत्रांव्यतिरिक्तही अनेक करिअर संधी उपलब्ध आहेत. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थी स्वतःची क्षमता ओळखून यशस्वी वाटचाल करू शकतात.

## SP बंगल्यावरील सुरक्षेत मोठी चूक

### रायफल सोडणाऱ्या पोलिसांचे निलंबन

जन सम्राट टाईम्स




**जळगाव (प्रतिनिधी) :** पोलीस अधीक्षक बंगल्याच्या सुरक्षेसाठी तैनात असताना कर्तव्यात गंभीर निष्काळजीपणा दाखवल्याबद्दल आणि शिस्तभंग केल्याबद्दल जळगाव पोलीस मुख्यालयातील दोन पोलीस अंमलदारांना तातडीने निलंबित करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक यांनी यासंदर्भातील कठोर आदेश निर्गमित केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ८ मे २०२६ रोजी रात्री ९:२० वाजेच्या सुमारास राखीव पोलीस निरीक्षक यांनी पोलीस अधीक्षकांच्या निवासस्थानावरील गार्ड ड्युटीचे अचानक निरीक्षण केले. या तपासणी दरम्यान, सुरक्षेसाठी तैनात असलेले सफौ/१३७८ संभाजी निबाजी पाटील आणि पोना/३९३ प्रदिप भगतसिंग राजपूत हे दोघेही आपल्या नेमणुकीच्या ठिकाणी अनुपस्थित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. तपासणीदरम्यान केवळ अंमलदार गैरहजर होते असे नाही, तर सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब उघडकीस आली. गार्ड रूममध्ये असलेली ३ एस.एल.आर. रायफल (बट नं. ८२.२६२.८८२) ही विना दारूगोळा आणि कोणत्याही सुरक्षेविना अत्यंत बेवारस स्थितीत टाकून देण्यात आली होती. संवेदनशील ठिकाणी तैनात असताना शस्त्रास्त्रांची अशी हेळसांड करणे सुरक्षेच्या दृष्टीने धोक्याचे मानले जाते. शिस्तभंगाची कारवाई केली असून जबाबदार पोलीस पदावर असूनही अशा संवेदनशील ठिकाणी कर्तव्यावर गैरहजर राहणे आणि शासकीय शस्त्रास्त्रांची सुरक्षितता न राखणे, हा 'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणूक) नियम १९७९' च्या नियम ३ चा भंग ठरला आहे. तपासणीदरम्यान केवळ अंमलदार गैरहजर होते असे नाही, तर सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर बाब उघडकीस आली. गार्ड रूममध्ये असलेली ३ एस.एल.आर. रायफल (बट नं. ८२.२६२.८८२) ही विना दारूगोळा आणि कोणत्याही सुरक्षेविना अत्यंत बेवारस स्थितीत टाकून देण्यात आली होती. या दोन्ही अंमलदारांचे वर्तन अत्यंत बेजबाबदार आणि गंभीर स्वरूपाचे असल्याने पोलीस अधीक्षकांनी त्यांना शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय जळगाव पोलीस मुख्यालय येथे निश्चित करण्यात आले असून, सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडण्यास मनाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

# हरिनाम सप्ताहानिमित्त ‘जीपीएस महिला मंडळा’ची स्थापना

## सौ. ममता पाटील यांच्या पुढाकारातून स्नेहमेळावा; सप्ताह यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी सहकार्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स



**पाळधी | प्रतिनिधी** धरणगाव तालुक्यात दरवर्षी पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या भव्य हरिनाम सप्ताह आणि कीर्तन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ‘जीपीएस महिला मंडळा’ची स्थापना करण्यात आली. जिप सदस्य प्रतापराव पाटील यांच्या सौभाग्यवती सौ. ममता पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. दरवर्षी जीपीएस मित्र परिवाराच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांना निमंत्रित करून भव्य हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. या धार्मिक सोहळ्यासाठी केवळ जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यभरातून हजारो भाविक कीर्तन श्रवणासाठी उपस्थित राहत असतात. सप्ताह यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते दिवसरात्र परिश्रम घेत असतात. याच कार्यातून प्रेरणा घेत सौ. ममता पाटील यांनी जीपीएस मित्र परिवारातील महिला सदस्यांची बैठक आयोजित केली. यावेळी महिलांना सप्ताहाच्या नियोजनाची माहिती देण्यात आली. उपस्थित सर्व महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सप्ताहासाठी सर्वतोपरी योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. यानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात महिलांमध्ये हितगुज करण्यात आले तसेच ‘जीपीएस महिला मंडळा’ची अधिकृत स्थापना करण्यात आली. विशेष म्हणजे, या मंडळात कोणतीही पदाधिकारी किंवा कार्यकारिणी न ठेवता सर्व सदस्यांनी समान सहभागातून कार्य करावे, अशी अनोखी संकल्पना मांडण्यात आली. या वेगळ्या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### उपस्थित महिलांना मार्गदर्शन

या धार्मिक सोहळ्यासाठी केवळ जिल्ह्यातूनच नव्हे तर राज्यभरातून हजारो भाविक कीर्तन श्रवणासाठी उपस्थित राहत असतात. सप्ताह यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते दिवसरात्र परिश्रम घेत असतात. याच कार्यातून प्रेरणा घेत सौ. ममता पाटील यांनी जीपीएस मित्र परिवारातील महिला सदस्यांची बैठक आयोजित केली. यावेळी महिलांना सप्ताहाच्या नियोजनाची माहिती देण्यात आली.यावेळी प्रतापराव पाटील यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करत वर्षभर विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली.